# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०५/०९/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १० कि मी अंतरावरील मौजा वडोदा येथे दिनांक ०४/०९/२०२२ चे १०.०० वा. ते १०.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— उमेश गोविंदराव ठाकरे, रा. वडोदा ता. कामठी जि. नागपुर हे घराच्या बाहेर निघुन आरोपी क्र. १. बंडु मारोती भोयर, वय ५५ वर्ष, रा. वडोदा ता. कामठी जि. नागपूर हा त्याच्या घराचे बांधकाम करीत आहे पाहीले असता आरोपी क्र. १ याच्या घरावरील पॅराफीट ही फिर्यादीच्या प्लॉटच्या हद्दीत आलेली दिसली. त्यावरुन फिर्यादी हे आरोपी क्र.१ याला आवाज दिला व त्याला म्हटले 'तु माझ्या हद्दीत विटा काढल्या आहे, ते विटा तु तुझ्या हद्दीत घे' या कारणावरुन आरोपी क्र. १ व त्याची पत्नी आरोपी क्र. २. मंदा बंडु भोयर, वय ४५ वर्ष दोन्ही रा वडोदा ता कामठी जि. नागपुर हे दोघेही फिर्यादीला शिवीगाळी करुन मारण्याची धमकी देवु लागले. त्या नंतर त्यांच्या पायाजवळ असलेली विट उचलुन त्यांनी फिर्यादीला मारली. त्यामुळे फिर्यादीचा उजवा हाताच्या मनघटाला लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक कोमल कडु मो.क्र. ९९२२४२१७९४ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील धंतोली काटोल येथे दिनांक ०४/०९/२२ चे २०.०० वा. ते २०.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— विशाल भगवान बाविसकर, वय ३२ वर्ष, रा. धंतोली काटोल हे गळपुरा चौक काटोल येथुन आपले मोटरसायकलने धंतोलीकडे जात असता धंतोलीकडे जाणारे रोडजवळ वळणावर आरोपी/मृतक नामे— अमोल वामनराव निदेकर, वय २८ वर्ष, रा. मालखेड ता. नेहर जि. यवतमाळ ह.मु. दोडकीपुरा काटोल हा त्याचे ताब्यातील एमएच— ४०/एबी— १२१२ क्रमांकाच्या मोटरसायकल नी भरधाव वेगाने चालवित समोरून वळन घेत असलेल्या पांढरी ॲक्टीवा गाडीला धडक मारून स्वताहा पडून जखमी होवुन जागीच मरण पावला. या अपघातात मृतक हा स्वताहाचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १८५ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास परी पोलिस उपनिरीक्षक लोखंडे मो.क्र ७७२१८१४३०० हे करीत आहे.

२) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील वायगाव घोटुर्ली येथे दिनांक ०२/०९/२२ चे २१.१५ वा. ते २१.२० वा. आरोपीने आपली एमएच– ४०/केआर– ७५३७ क्रमांकाची कार हि भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पयदळ रस्ता ओलांडणारे वसंतलाल ब्रिजलाल सुर्यवंशी, वय ४८ वर्ष रा. एम.के.डी.एन.क्यु क्र. ४३५, डब्लुसीएल कॉलनी उमरेड यांना धडक दिली. या अपघतात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी वोकहार्ट हॉस्पीटल, नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यु झाला. पो.स्टे. उमरेड येथे मेडीकल कॉलेज येथुन सुचने प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार आनंद धात्रक पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ अ भादवी सहकलम १८४ ए, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राजु वासुदेव डोर्लीकर मो नं ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा:– दिनांक ०५/०८/२२ चे १२.०९ वा. ते दि. ०३/०९/२२ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय ४५ वर्ष यांचे मोबाईल क्रमांकावर अज्ञात आरोपीने वांरवांर फोन करुन तिला लज्जास्पद शब्दात बोलून फिर्यादी हिची बदनामी होईल या उद्देशाने वांरवार फोन करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर